पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५१००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.- पोउपआ(मुख्या)/घोडबंदर रोड/अवजड वाहने डायव्हर्जन/अधिसूचना-१०७९/२०२५ दि. २१/११/२०२५

"ठाणे घोडबंदर राज्यमार्ग" या रस्त्यावरील घाटभागाच्या कामांतर्गत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दित वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक नियंत्रण अधिसूचना

ज्याअर्थी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री. दिपक खांबित यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. मनपा/साबां/वि./शा.अ-३/६३२७/२०२५-२६, दिनांक २१/११/२०२५ अन्वये आमचे असे निदर्शनास आणून दिले आहे की, ठाणे ते घोडबंदर राज्यमार्ग क्र. ८४ या रस्त्यावरील घाटभागाच्या भौमितीक सुधारणा करण्याच्या कामांतर्गत ठाणेकडून घोडबंदरला येणाऱ्या रस्त्यावर निरा केंद्र-काजु पाडा ते हॉटेल फाऊंटन दरम्यान ग्राऊटींगचे व मास्टिक असफाल्टचे काम दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्रौ ००.०१ वा. पासून ते दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्रौ २३.५९ वा. पर्यंत करावयाचे आहे. त्याकरीता जड-अवजड वाहनांना प्रवेश बंद करणे आवश्यक असून आयुक्तालयाच्या परिसरात वाहतुक कोंडी होऊ नये, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे सर्वसामान्य जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे. याकरिता मुंबई- अहमदाबाद महामार्गावर सुरु असलेली जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद ठेवूण पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी अशोक तानाजी विरकर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व विशेष शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उप आयुक्त म्हणून राष्ट्रीय महामार्गावर व ठाणे-घोडबंदर रोडवर वाहतूक कोंडी होऊन सामान्य जनतेची, प्रवाशांची गैरसोय होवु नये व अपघात होऊ नये यासाठी मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम. व्ही.ए-११६/सीआर/३७/टी.आर,दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद- १) राष्ट्रीय महामार्ग क्र ४८- पालघर-विरार बाजूकडून येणारी वाहनांना **शिरसाड फाटा पासून वरसावे बाजूकडे येण्यासाठी प्रवेश बंद.**

पर्यायी मार्ग – शिरसाड फाटा-पारोळ-अकलोली (गणेशपुरी)- अंबाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद- ३) राष्ट्रीय महामार्ग क्र ४८- पालघर- वसई बाजूकडून येणा-या सर्व अवजड वाहनांना **चिंचोटी नाका पासून वरसावे बाजूकडे येण्यासाठी प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – चिंचोटी मार्गे-कामन-खारबांव-अंजुरफाटा, भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद- ४) पश्चिम दृतगती मार्ग मुंबई व काशिमीरा बाजूकडून घोडबंदर रोड, ठाणे करीता जाण्यासाठी **फाऊंटन हॉटेल जवळ प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने वरसावे उड्डानपुलावरुन सरळ गुजरात राष्ट्रीय महामार्गावरुन शिरसाड फाटा-पारोळ-अकलोली (गणेशपुरी)- अंबाडी मार्गे किंवा चिंचोटी मार्गे-कामन-खारबांव-अंजुरफाटा, भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना **दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्री ००.०१ वा. पासून ते दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्री २३.५९ वा. पर्यंत** अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुगणवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी अशोक तानाजी विरकर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व विशेष शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज **दिनांक २१/११/२०२५ रोजी** माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

(अशोक तानाजी विरकर)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय व विशेष शाखा
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.

आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-

१. मा. पोलीस अधीक्षक,. पालघर
२. मा. पोलीस उप आयुक्त, वाहतूक, ठाणे शहर.
३. मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पश्चिम उपनगरे, मुंबई.
४. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, मिरा-भाईंदर, वसई-विरार.
५. प्रभारी अधिकारी- काशिमीरा, वसई व विरार वाहतूक विभाग
   प्रभारी अधिकारी - काशिगांव, नायगांव, वालीव, माणिकपूर, विरार, मांडवी पोस्टे.
६. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय

प्रत-

१. **मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई**
२. **सर्व संबधित वाहतूक संघटना**

प्रत सस्नेह अग्रेषित –

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, परिमंडळ-२, परिमंडळ-३, मिरा-भाईंदर,वसई-विरार

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१. मा. अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार.
३. मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
४. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे व मा. जिल्हाधिकारी, पालघर.
६. मा.आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका व मा. आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका.